पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८

शहर अभियंता कार्यालय

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत करण्यात येणा-या विविध विकास प्रकल्पाच्या कामांकरिता तज्ञ सल्लागार व वास्तुविशारद यांचे पॅनेल नियुक्तीबाबत...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत दि. ०३/०३/२०२५ रोजी प्रंकल्प सल्लागार व वास्तुविशारद यांची नव्याने नोंदणी साठी जाहीरात प्रसिध्द करणेत आली असता अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. ११/०३/२०२५ ठेवणेत आली आहे. सदर मुदत वाढविणेबाबत बहुतांशी सल्लागार व वास्तुविशारद यांनी मागणी केली आहे. त्यानुसार अर्ज करण्याची मुदत दि. २१/०३/२०२५ पर्यंत वाढविण्यात येत आहे.

संपर्कासाठी ईमेल-civil@pcmcindia.gov.in

संपर्कासाठी दूरध्वनी क्र. 020-67331413 / 020-6733141

शहर अभियंता

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी-४१११०१८

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८

## शहर अभियंता कार्यालय

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत करण्यात येणा-या विविध विकास प्रकल्पाच्या कामांकरिता तज्ञ सल्लागार व वास्तुविशारद यांचे पॅनेल नियुक्तीबाबत...

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत करण्यात येणा-या विविध विकास प्रकल्पाच्या कामांकरिता नियुक्त करणेत आलेले सल्लागार व वास्तुविशारद यांचे जुने पॅनल मा. आयुक्त यांचे सूचनेनुसार रद्द करण्यात आलेले आहे. नवीन पॅनलसाठी र.रू. ५ कोटी पेक्षा जास्त रक्कमेच्या कामांकरिता तज्ञ सल्लागार व र.रू. २ कोटी पेक्षा जास्त रक्कमेच्या कामांकरिता वास्तुविशारद यांची खाली नमूद केलेल्या विभागांमध्ये व प्रकारांमध्ये मनपा पॅनेलवर नव्याने नियुक्तीबाबत पात्र अभियंता / वास्तुविशारद यांचेकडून अर्ज मागविणेकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत सदरचे जाहीर प्रकटन देणेत येत आहे.

| अ.क्र. | सल्लागार वर्गीकरण | कामाच्या रक्कमेनुसार करणेत येणा-या श्रेणी |
|---|---|---|
| १ | इमारत बांधकाम | i)र.रु.५ ते २० कोटी<br>(ii) र.रु. २० ते ५० कोटी व<br>(iii) र.रू. ५० कोटी पुढील कामे |
| २ | रस्ते बांधकाम | |
| ३ | पूल (नदीवरील पूल, समतल विलगक, उड्डाणपूल, भुयारी मार्ग, लोहमार्गावरील पूल) | |
| ४ | पाणीपुरवठा व जलः निस्सारण | |
| ५ | उद्यान (स्थापत्य + आर्किटेक्ट / हॉर्टिकल्चर संयुक्त उपक्रम) | |
| ६ | विद्युत | |
| ७ | पर्यावरण अभियांत्रिकी(स्थापत्य + पर्यावरण विशेषज्ञ) | |
| ८ | गृहनिर्माण व झोनिपू प्रकल्प | |

| अ.क्र. | वास्तुविशारद वर्गीकरण | कामाच्या रक्कमेनुसार करणेत येणा-या श्रेणी |
|---|---|---|
| १ | इमारत व आंतरिक रचना / आराखडा | i)र.रु.२ ते ५ कोटी<br>ii) र.रु.५ ते २० कोटी<br>(iii) र.रु. २० ते ५० कोटी व<br>(iv) र.रू. ५० कोटी पुढील कामे |
| २ | उद्यान व लँडस्केपिंग | |
| ३ | शहरी रस्त्यांचे रचना / आराखडा/क्रीडा | |

प्रकल्प सल्लागार / वास्तुविशारद यांना वरीलप्रमाणे कोणत्याही प्रकार व श्रेणीमध्ये अर्ज करता येईल.

प्रकल्प सल्लागार / वास्तुविशारद नेमणुकीकरिता आवश्यक असलेली कागदपत्रे

१) प्रकल्प सल्लागार /वास्तुविशारद हा शासकीय/निमशासकीय संस्थेमध्ये मान्यताप्राप्त असलेबाबतचे प्रमाणपत्र.

२) वास्तुविशारद यांचेकडे Council of Architect चे नोंदणी प्रमाणपत्र.

३) प्रकल्प सल्लागार / वास्तुविशारद यांना कमीत कमी ५ वर्षांचा प्रकल्प सल्लागार / वास्तुविशारद क्षेत्रातील कामाचा अनुभव असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

४) ज्या वर्गामध्ये काम करावयाचे आहे त्या वर्गातील मागील ५ वर्षात प्रकल्प सल्लागार/वास्तुविशारद यांनी त्या वर्गातील रक्कमेच्या पुर्ण केलेल्या किमान किंमतीच्या कामाची खाली नमूद केलेल्या अर्हतेनुसार काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र

अ-कमीत कमी तीन कामे (शासकिय / निमशासकीय) ज्याची काम निहाय किंमत, त्या वर्गातील रक्कमेच्या ४०% पेक्षा कमी नसावी.

किंवा

ब- कमीत कमी दोन कामे (शासकिय / निमशासकीय) ज्याची काम निहाय किंमत, त्या वर्गातील रक्कमेच्या ५०% पेक्षा कमी नसावी.

किंवा

क- कमीत कमी एक काम (शासकिय / निमशासकीय) ज्याची काम निहाय किंमत, त्या वर्गातील रक्कमेच्या ८०% पेक्षा कमी नसावी.

५) शासकीय कामे पूर्ण केलेबाबतचे जबाबदार शासकीय / निमशासकीय अधिका-याने दिलेले अनुभव प्रमाणपत्र त्याबद्दल सल्लागार शुल्क मिळालेचे आयकर पुरावा/बँक स्टेटमेंट.

६) संस्थेमध्ये काम करणा-या सर्व जबाबदार कर्मचा-यांचे शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्र, पगार स्लिप, छायाचित्र, आधार कार्ड, तसेच पॅन कार्डची प्रत अर्जासोबत सादर करावे.

७) संस्थेचे G.S.T. नोंदणी व Shop-act नोंदणी प्रमाणपत्र.

८) सर्व कागदपत्रे सत्य असलेबाबतचे विहित नमुन्यामध्ये स्वयं-साक्षांकित प्रमाणपत्र.

वरीलप्रमाणे आवश्यक असणा-या सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती नोटराईज्ड करून मनपा संकेतस्थळावर अपलोड करण्यात याव्यात.

- प्रकल्प सल्लागार / वास्तुविशारद संस्थाचालक हा मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील पदवी/पदव्युत्तर पदवीधारक अभियंता / वास्तुविशारद असावा तसेच तो ज्या विभागांमध्ये व प्रकारांमध्ये काम करणार आहे. त्याच अभियांत्रिकी / वास्तुविशारद विभागाचा पदवीधारक असणे आवश्यक आहे.
- वास्तुविशारद यांचे साठी खाजगी कामांचा अनुभव ग्राह्य धरणेत येईल परंतु अशा वास्तुविशारद यांना ज्या स्वरूपाच्या इमारतींचा कामाचा अनुभव आहे त्याच इमारतींच्या कामासाठी अर्ज करता येईल. त्याकरीता काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

पात्र अभियंते/वास्तुविशारद यांनी शहर अभियंता कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे कार्यालयात वर नमूद केलेल्या कागदपत्रासह अर्ज करावेत. अर्ज करणेची अंतिम मुदत दि. ११ मार्च २०२५ अशी राहिल. अर्जासोबत प्रत्येक श्रेणीसाठी ३ वर्षाकरिता अर्ज शुल्क र.रु.१००० व नोंदणी शुल्क म्हणून र.रु. १००००/- भरावे लागतील. एका पेक्षा जास्त श्रेणीसाठी अर्ज करावयाचे असल्यास प्रत्येक श्रेणीसाठी स्वतंत्र अर्ज व स्वतंत्र शुल्क फी भरावी लागेल.

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. सं-२०१८/प्र.क्र. ५४/नवि-१६, दि. ४/६/२०१८ मधील प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क व त्याच्या प्रधानाबाबत निर्धारित केलेल्या मार्गदर्शक सुचनांमध्ये नमूद केलेप्रमाणे प्रकल्प सल्लागार / वास्तुविशारद फी अदायगी करणेत येईल. सदरबाबत मा. आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहिल. प्रकल्प सल्लागार / वास्तुविशारद यांची नेमणूक जरी ३ वर्षाकरिता असेल तरी सुध्दा त्यांना प्रकल्प सल्लागार यादीतून कोणत्याही क्षणी वगळण्याचे अधिकार मा. आयुक्त यांचेकडे राखून ठेवणेत आले आहेत.

संपर्कासाठी ईमेल-civil@pcmcindia.gov.in

संपर्कासाठी दूरध्वनी क्र. 020-67331413 / 020-6733141

शहर अभियंता

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी-४११०१८